विद्यापीठ अनुदान आयोग,नवी दिल्ली पुरस्कृत

# "मराठी साहित्यातील नवे प्रवाह"

## राष्ट्रीय चर्चासत्र

दि. ३० सप्टेंबर व ०१ ऑक्टोंबर

संयोजक

**मराठी विभाग**

**श्री सिध्देश्वर महाविद्यालय,माजलगाव**

ता.माजलगाव जि.बीड ४३१ १३१

E-mail - siddheshwar.college@gmail.com

Website : www.siddheshwarcollege.com

1-82981-345-4

केल्याने होत आहे रे । आधि केलेचि पाहिजे ।।

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित,

# श्री सिध्देश्वर महाविद्यालय,माजलगाव

ता.माजलगाव ४ ३ १ १ ३ १ जि.बीड (महाराष्ट्र)

**विद्यापीठ अनुदान आयोग,नवी दिल्ली पुरस्कृत व**

**श्री सिध्देश्वर महाविद्यालय,माजलगाव**

**यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित**

## राष्ट्रीय चर्चासत्र

## "मराठी साहित्यातील नवे प्रवाह"

मुख्य संपादक

डॉ.कमलाकर कांबळे

सहसंपादक

डॉ.रमेश वसंतराव गटकळ

संपादक

डॉ.ज्ञानेश्वर कोंडीराम गवते

| अ.क्र. | शोधनिबंधाचे नाव | लेखकाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| ३९) | ग्रामीण कादंबरीच्या वाटचालीतील नवी परिणामे | प्रा.रमेश रिंगणे | १२२ |
| ४०) | मराठी ग्रामीण कादंबरीवरील जागतिकीकरणाचा प्रभाव | प्रा.संगिता मोरे | १२४ |
| ४१) | स्त्रीवादी साहित्याची वाटचाल | प्रा.शरदचंद्र देगलुरकर | १२७ |
| ४२) | दलित साहित्याची अपूर्वता | डॉ.विश्वनाथ रत्नाळीकर | १२९ |
| ४३) | ग्रामीण साहित्याच्या वाटचालीच्या दिशा | प्रा.वैशाली कोटंबे | १३१ |
| ४४) | मराठी ख्रिस्ती साहित्य | प्रा.प्रशांत शेळके | १३३ |
| ४५) | दलित साहित्य चळवळ | प्रा.स्वप्ना मानखेरे | १३७ |
| ४६) | मुस्लीम काव्य साहित्यातील आई | डॉ.आर.टी.सोनटक्के | १४२ |
| ४७) | ग्रेस महाकवी दु:खाचा | डॉ.ज्ञानेश्वर गवते | १४५ |
| ४८) | मराठी कादंबरी व स्त्रीवाद | प्रा.विठ्ठल भाणुसे | १४७ |
| ४९) | ग्रामीण साहित्य | प्रा.सौ.अपर्णा कुलकर्णी | १५० |
| ५०) | आदिवासी समाज एक दृष्टिक्षेप | प्रा.आर.एस.अहिरे | १५३ |
| ५१) | समकालीन मराठी जैन कथा नवी दृष्टी आणि नवी अभिव्यक्ती | डॉ.अलका वालचाळे | १५५ |
| ५२) | आधुनिक मराठी स्त्रीवादी साहित्य.बदलते संदर्भ | प्रा.रामेश्वर चाटे | १५८ |
| ५३) | दलित कथेचे शिल्पकार बाबूराव बागूल | प्रा.आर.आर.बडुरे | १६१ |
| ५४) | आदिवासी लोकगीतातील स्त्री जीवन दर्शन | प्रा.सो.एन.एन.मास्कर | १६४ |
| ५५) | आदिवासी कवितेतील परिवर्तन विचार | डॉ.माधव जाधव | १६७ |
| ५६) | आक्रोश व्यक्त करणारी गोलपीठा | डॉ.शंकर वाघमारे | १७१ |
| ५७) | मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीतील प्रादेशिकता | प्रा.एस.एस.देशमुख | १७३ |
| ५८) | जनसाहित्य:संकल्पना,स्वरुप,वैशिष्ट्ये व महत्व | कमलाकर राऊत | १७७ |
| ५९) | १९६० ते १९७५ या कालखंडातील ग्रामीण कादंबरी स्वरुप व आशय | प्रा.बी.एन.देशमुख | १८२ |
| ६०) | अण्णाभाऊ साठेंचा वाङ्मयीन दृष्टिकोन | प्रा.प्रल्हाद भोपे | १८७ |
| ६१) | बालवाङ्मयाचे स्वरुप आणि वैशिष्ट्ये | प्रा.दिलीप भिसे | १८९ |
| ६२) | काळोखाच्या गर्भात:एक आकलन | प्रा.भरत खेत्रे | १९२ |
| ६३) | स्त्रीवादी साहित्याचे स्वरुप,भूमिका आणि स्त्री आत्मचरित्राचे यश | डॉ.शिवाजी पाटील | १९४ |
| ६४) | ग्रामीण साहित्य प्रवाह एक दृष्टिक्षेप | प्रा.सुरेश व-हाड | १९८ |
| ६५) | १९६० नंतरची नव कादंबरी:एक चिंतन | प्रा.अमजद अत्तार | २०० |
| ६६) | आदिवासी :लोकजीवन आणि लोकसाहित्य | प्रा.एस.एस.दोंदे | २०२ |
| ६७) | मराठी साहित्यातील नवे प्रवाह | डॉ.बाळासाहेब दास | २०८ |
| ६८) | दलित स्त्री लेखिकांचे आत्मकथन | डॉ.देविदास तेलंगे | २१५ |
| ६९) | स्त्रीवादी दृष्टीकोनातून नारायण सुर्वे यांची कविता | प्रा.अभिमन्यु ओहळ | २१८ |
| ७०) | नामदेव ढसाळांची कादंबरी:हाडकी हाडवळा | डॉ.चिस्ती असिया | २२१ |
| ७१) | वामन जाधव यांच्या कथेतील ग्रामीण वास्तव | हिराचंद मोरे | २२५ |
| ७२) | मराठी साहित्यात भटक्या विमुक्तांच्या साहित्यांचे योगदान | डॉ.व्ही.एन.पाटील | २२९ |
| ७३) | आयदान मधील दलित स्त्री जीवन | सारिका बुरंगे | २३२ |
| ७४) | रा.रं.बोराडे यांच्या कादंबरीतील ग्रामीण वास्तवाचे चित्रण | प्रा.किशोर पाठक | २३५ |
| ७५) | मराठी ग्रामीण कादंबरीचे स्वरुप | प्रा.एम.ए.कव्हळे | २३७ |
| ७६) | दलित कविता:स्वरुप आणि समस्या | प्रा.एम.एस.जगताप | २४० |
| ७७) | नव्या पिढीतील दलित साहित्यिकासमोरील आव्हाने | डॉ.अनंत राऊत | २४५ |
| ७८) | मराठी दलित कवितेतील विद्रोहाचे स्वरुप | प्रा.विनोद कांबळे | २४८ |

ISBN No.978-1-62951-345-4

# ३१. ग्रामीण कादंबरीच्या वाटचालीतील नवी परिणामे

प्रा.रमेश बाबासाहेब रिंगणे

"भारत हा कृषिप्रधान देश आहे" हे किती आणि कसे खरे आहे हे तुम्हा- आम्हा सर्वांनाच माहित आहे. तरीही या भारतात ग्रामीण भाग, ग्रामीण समाज, ग्रामीण माणसे यांना, विचाराच्या शब्दाच्या, साहित्याच्या कक्षेत यायला म.गांधीच्या 'खेड्याकडे चला' या हाकेपर्यंत वाट पहावी लागली. कारण नागर आणि ग्रामीण या दोन सज्ञांनी ध्वनित होणारे अर्थ फार निरनिराळे आहेत. केवळ साहित्याच्याच नव्हे, तर एकंदरीत जीवनाच्या क्षेत्रातील, जीवनाच्या सर्व पातळ्यावरील या शब्दांच्या अर्थात वेगळीकता आहे. त्या-त्या अर्थाची एक जीवन पद्धती त्यात सामावलेली असते. १९२० ला अर्थपुर्ण झालेली ही 'ग्रामीण' संकल्पना साहित्याच्या बाबतीत खऱ्या अर्थाने रुजली ती १९६० नंतरच. जानपद गीतांच्या माध्यमातून ग्रामीण कविता प्रकटली असली तरी १९२० नंतर मराठीमध्ये कविता, कथा आणि कादंबरी या वाङ्मय प्रकारामधून ग्रामीण जीवनाचित्रणाला प्रारंभ झाला.

ग.ल.ठोकळ, र.वा. दिघे, वि.वा. हडप, श्री.म.माटे, व्यंकटेश माडगुळकर, शंकर पाटील, आनंद यादव, रा.रं. बोराडे, उद्धव शेळके, भास्कर चंदनशिव, विश्वास पाटील ते आजच्या पिढीतील नव ग्रामीण कादंबरीकार यांच्या पर्यंतची जी सलग परंपरा रेखाटता येते ती 'बळीबा पाटील', '१८५७ चा दुष्काळ', 'पिराजी पाटील' या मराठीतील ग्रामीण कादंबरी पासून निसर्ग, शेती, शेतकरी, यांच्या भोवतीची परिस्थिती म्हणजेच ग्रामीण संस्कृती ठरते. शेतीच्या अनुषंगाने येणारे व्यवहार व जीवन संदर्भ हेच ग्रामीण संस्कृतीचे वैशिष्ट्ये होत. असा हा गावगाडा कृषिजाणिवांशी निगडीत असणारा आहे. त्यामुळे ग्रामीण संस्कृती ही कृषिसंस्कृती असणार हे ही उघडच आहे. म्हणून शेती, शेतीची कामे, पिके यांचे आणि उत्सवांचे सणाचे एक आंतरिक नाते आहे. म्हणजेच प्राचीन काळापासून साकारत आलेली खेड्यातील लोकांच्या जगण्याची रीत म्हणजेच ग्रामीणत्व होय.

साधारणत: १९४५ पर्यंतची मराठी ग्रामीण कादंबरी मध्यवर्ती धारेशी संवादी अशीच राहिली. ग्रामीण कादंबरीच्या वाटचालीतील इथ पर्यंतचा प्रवास हा अनेक प्रेरणा- प्रवृत्तींनी साकारला आहे. म.फुले, म. गांधी यांचे विचार ज्यामुळे राजकीय व सामाजिक यांच्यात समन्वय साधला गेला, सामाजिक विषमतेच्या विरोधातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य, कम्युनिस्ट पक्षाची स्थापना या महत्त्वपुर्ण घटना या कालखंडात घडल्या तरी मराठी ग्रामीण कादंबरी ही समाज सापेक्ष झाली नाही असेच आहे. दिघे यांच्या 'सराई', 'पाणकळा', भोसलेंची 'समरांगण', द.र. कवठेकर यांची 'रेशमाच्या गाठी', 'सावलीच्या उन्हात' ही अत्तरहे यांची किंवा या आणि या सारख्या कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनातील चित्रण तितक्या बारकाव्यानिशी आले, असे नाही. तर ना.सी. फडके यांच्या कलावादी दृष्टीकोनातून प्रत्येक साहित्याची ओळख होऊ लागली. म्हणजेच ग्रामीण जीवनाचे प्रश्न, जीवन पद्धती, ग्रामीण मानसिकता यांची योगायोग, रम्यता, अद्भुतता, रंजकता या अंगाने मांडणी होऊ लागली आणि खऱ्या अर्थाने ग्रामीण भाग, ग्रामीण समाज, खेड्यातील भयान वास्तवाकडे डोळेझाक होऊ लागली. ग्रामीण कादंबरीच्या बाबतीत एकच अनुकूल घटना या काळात घडली ती ग्रामीण कादंबरीत भरघोस निर्मिती होऊ लागली, आणि ती निर्मिती लोकप्रिय झाली. १९४५ नंतरचा कालखंड मराठी ग्रामीण कादंबरीच्याच नव्हे तर एकुणच भारतीय साहित्याच्या क्षेत्रातील परिवर्तनाचा काळ होता. विशेषत: हा कालखंड ग्रामीण साहित्याच्या दृष्टीने वास्तवाभिमुखतेचा ठरला.

बी.सी. मर्ढेकर यांनी 'तांबडी माती' व 'पाणी ' या कादंबऱ्यातून आधुनिकी करणाच्या विळख्यातील ग्रामीण संस्कृतीची घुसमट व उद्धस्तता रेखाटली. तसेच वि.वा.हडप यांनीही 'गोदाराणी' 'अन्नदाता उपाशी' या कादंबरीच्या माध्यमातून मार्क्सवादी दृष्टीची जोड साहित्याला दिली. यांनी तितक्याच सुक्ष्म दृष्टीने ग्रामीण जीवनानुभवांचा वेध घेतला. पण या दोघांची मराठी अभ्यासकांनी ग्रामीण कादंबरीकार म्हणून फारशी दखल घेतलेली दिसत नाही.

विभावरी शिरुरकारांची 'बळी', बा.भ.बोरकरांची 'भावीण', श्री.ना. पेंडसे यांची 'एल्गार', 'हद्पार', 'गारबीचा बापू', 'कलंदर', दांडेकरांची 'पडघवली', 'पवनाकाठचा धोंडी','माचीवरला बुधा', व्यंकटेश माडगुळकर याची 'बनगरवाडी', आणि अण्णाभाऊ साठे यांची 'फकीरा' या कादंबरीचे लेखन विविधांगी अनुभवा सोबतच, वास्तविकतेच्या पायावर झाले. साहित्य आणि वास्तव, प्रत्यक्ष जीवन यांच्यात कलात्मक ताळमेळ बसवत, अस्सल जीवनदर्शन प्रामाणिक अभिव्यक्तीसह आले. मराठी साहित्य ग्रामीण कादंबरीच्या माध्यमातून जीवन वास्तवाशी अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न करु लागले.

पुढे दोने महायुद्धांनी संबंध विश्व थरारुन गेले. मानवी मनाच्या पार आतून कुठे तरी माणूसकीचा गहिवर दाटून आला. माणूस मग मानवतावादाकडे पुन्हा आकर्षित होऊ लागला. यातच भारतीयांना स्वातंत्र्य प्राप्ती झाली आणि स्वातंत्र्याची अनुभूती येऊ लागली याचाच परिणाम म्हणून साहित्यात अभिनवता येऊ लागली.

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाने पुन्हा एकदा स्वातंत्र्याचा जागर झाला आणि ग्रामीण जीवनातील विविध व्यथा वेदना आणि समस्या जीवनवादी दृष्टीकोणातून मुखर होऊ लागला. यात उद्धव शेळके यांची 'धग' व मनोहर तल्हार यांची 'माणूस' या दोन कादंबऱ्याचे मौलिक योगदान आहे. 'फकीरा', 'इंधन', 'टारफुला' आदी कादंबऱ्या यातून आलेल्या आहेत. 'साठोत्तरी ग्रामीण कादंबरी'

हे एक वेगळे परिमाण ग्रामीण कादंबरीला या काळात मिळाले. त्यानंतर आलेल्या रा.रं. बोराडे यांची 'पाचोळा' व आनंद यादव यांची 'गोतावळा' या कादंबऱ्यांनी परिवर्तनाची दखल घेतली व कोलमडून पडलेल्या माणसांची, संसाराची वाताहत प्रतिनिधीक स्वरुपात मांडण्याचा प्रयत्न केला.

१९७०-८० च्या दशकात महाराष्ट्रातील वातावरण व वाङ्मयीन पर्यावरण बदलू लागले. स्वातंत्र्यानंतरची पिढी शिकू लागली, लिहू लागली, वाचू लागली त्या पिढीला आपला गाव-भावासह कुठेच दिसत नव्हता म्हणून यांनी प्रस्थापित अभिरुचीशी संघर्षशील भूमिकेने सामना करावयाचा ठरवला आणि मग वास्तवाच्या मागचा वास्तविक शोध घेण्याचा प्रयत्न सुरु केला. यातूनच ग्रामीण साहित्याच्या चळवळीने जोर धरला. यात अनेक नवे लेखक लिहिते झाले. गणेश आवटे यांची 'गणगोत' यातूनच नावारुपाला आली. बाबाराव मुसळे यांनी 'हाल्या हाल्या दूध दे' अशी शेतकऱ्यांची ससे होलपट रेखाटली आहे. याच जाणिवेतून 'नटरंग' देखील उभ्या आयुष्यात संघर्षशील बनवला तो आनंद यादवांनी.

ग्रामीण भागातील शिक्षण, समाज कारण, राजकारण, कशी वर्तने घेत आहे याची दखल नागनाथ कोत्तापल्ले - 'मध्यरात्र', 'गांधारीचे डोळे' यातून घेतात. अशाच नव्या साहित्यिका बरोबरच 'चारापाण्या' च 'सावट' आणि राजकारणाचा आखाडा 'आमदार सौभाग्यवती' पर्यन्त कसा घरात प्रवेश करतो. याचे प्रत्यंतर जुने साहित्यिक रा.रं. बोराडे ही व्यक्त होत होत ग्रामीण समाजाला भावानुभवासह व्यक्त व्हायला लावतांना देतात. 'झाडाझाडती', 'ताम्रपट', 'कोयता', 'तहान' या कादंबऱ्या हिणकस प्रवृत्तीची, नेतृत्वाच्या रंग बदलू चेहऱ्याची मुखवटे सर्वांसमोर उतरवतात. 'जितगाणी' व 'राहू केतू' मधुन स्त्री प्रश्नाचा वेध मधू सावंत घेतात.

एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्या पर्यंत सामाजिक, धार्मिक, राजकीय, नैसर्गिक संकटाचा सामना करत ग्रामीण समाज कसा आला याचा आलेख आपण या ग्रामीण कादंबरीच्या सांस्कृतिक, साहित्यिक ठेव्यातून मांडू शकतो.

२००० नंतरची सर्वच परिस्थिती बदलली, माणूस सर्व अंगोपांगासहीत बदलून गेला व नेमकेपणाचा वेध घेण्याचा अट्टाहास तो करु लागाला. म्हणजेच ग्रामीण भागात, ग्रामीण माणसात अंशतः यांत्रिकता मुरली पण शेतीचा बाज हरवला हे ही तितकेच खरे. भावबंध गळून पडत जात आहेत, व्यावहारिकता जिकडे तिकडे नांदते आहे, अशात चुकणारी गणित शेतीच्या माध्यमातून शेतकरी पुन्हा पुन्हा मांडतो आहेतच हे 'बारोमास' मधून सदानंद देशमुख दाखवून देतात. कधी- अतिवृष्टी - कधी दुष्काळ या दोन्हीचा समन्वय साधण्याची केविलवाणी तळमळ शेतकरी करतो आहे. तरीही तो शेती-मातीच्या गराड्यातून केवळ आणि केवळ आशावाद घेऊन पुन्हा उभा राहतोच राहतो आहे. 'धुळपेरणी' ही शेषेराव मोहिते यांची, भारत काळे यांची 'ऐसे कुणबी भूपाळ', भिमराव वाघचोरे यांची 'गराडा' मधुन शेती शेतकरी यांच्या हाल आपेष्टांचा पाढा वाचण्यात येतो, असे नव्हे तर जीवनाचे भयावह प्रश्न म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. पुन्हा 'मरणदारी' उभे असतानाही शेतीची अनावर ओढ लागलेली असते हे रा.रं.बोराडे वेगवेगळ्या अनुभवाचे विश्व उभे करतात.

राजकीय व सामाजिक आघात दर्शविणारा 'चेअरमन' ही अशोक कुलकर्णी उभा करतात, तर 'आणि धरणीकंप होत राहिला' व 'अंधार इथला संपत नाही' मधून नैसर्गिक आपत्तीचे कसे राजकीय सोने केले जाते याचे चित्रण भालचंद्र देशपांडे करतात. 'कापूस काळ' मधून केलास दौंड शेतकऱ्याचे सोनं कस त्यांनाच फसवं ठरवत हे मांडतात. तर 'झिम पोरी झिम' म्हणत बालाजी इंगळे बदलत्या ग्रामीण वास्तवातील स्त्रीयांचा छळवाद मांडतात. अशा प्रकारे ही मराठी ग्रामीण कादंबरीची वाटचाल नव नव्या परिमाणातून झाली आहे. ती पुढे ग्रामीण वास्तवाच्या बदलेल्या प्रक्रियेवर अवलंबून असली तरी साचलेली मरगळ, काळाच्या ओघात पडलेल्या मर्यादा, झटकत-तोडत पुन्हा नव्याने शब्दबद्ध होतेच आहे, होणारही आहे.

एकूण ग्रामीण कादंबरीची वाटचाल आपण पाहिली तर ती निश्चितच गौरवशाली आहे असे म्हणावे लागते. पण आणखीही ग्रामीण कादंबरीला धगधगीत सत्याचा, अस्सल असा, नवा आणि अंतर्मुख करणारा टप्पा येत्या काळात चढावाच लागेल. या धरणीचा पोसिंदा आणि त्यांच्या जीवनानुभवाचे प्रतिनिधीत्व करणारा हा वाङ्मय प्रकार एका व्यापक जाणिवेने, जीवनाशी थेट भिडावेत जेणे करुन आपल्या स्वत्वाचे बदलते संदर्भ अधोरेखित होतील. सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक आणि सांस्कृतिक या सर्व पातळ्यावर या कृषिप्रधान देशात या ग्रामीण कादंबरीची नोंद येत्या काळात फक्त वाङ्मयेतिहासानेच नाही तर इतिहासाने ही घ्यावी. एवढी धाडसी वृत्ती आणि प्रामाणिकपणा येणाऱ्या काळात ग्रामीण कादंबरीकारांनी जोपासावा हीच मराठी साहित्यातील नव्या प्रवाहांची परिनिती होय.

संदर्भग्रंथ :-

१) प्रदिक्षणा : खंड दुसरा
२) आनंद यादव : ग्रामीणता साहित्य आणि वास्तव
३) नागनाथ कोत्तापल्ले : ग्रामीण साहित्य स्वरुप आणि शोध
४) प्रल्हाद लुलेकर : मराठावाड्यातील साहित्य
५) लोकराज्य : जाने-फेब्रुवारी २०१२
६) ग्रामीण, दलित, स्त्रीवादी साहित्य
: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा.रमेश बाबासाहेब रिंगणे**
कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजी नगर,
गढी ता.गेवराई जि.बीड

***